वाचा :- १) या कार्यालयाचे आदेश जा.क्र. साप्रवि/आस्था-१/६४१/२०१७ दिनांक-२९/०४/२०१७

२) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस जा.क्र. साप्रवि/आस्था-१/१०९८/२०१७ दिनांक-०५/०७/२०१७

३) कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक- /०७/२०१७.

---

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
जा.क्र.साप्रवि/आस्था-१/११६०/२०१७
नाशिक दिनांक- ०९/०७/२०१७

**आदेश**

उक्त वाचा क्र. १ अन्वये श्री.नितीन उपासनी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रभारी, जिल्हा परिषद नाशिक तथा शिक्षणाधिकारी महानगरपालीका, नाशिक यांचेकडील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक हया पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. सदर कार्यभार दिनांक- ०९/०७/२०१७ रोजी मध्यान्होत्तर या आदेशान्वये काढुन घेण्यात येत आहे. सदर कार्यभार श्री / श्रीमती भावना राजनोर शि.अ.(निरंतर) जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडेस अतिरिक्त म्हणून सुपुर्द करण्यात येत आहे.

श्री / श्रीमती भावना राजनोर, शि.अ.(निरंतर) जिल्हा परिषद, नाशिक यांनी त्यांचेकडील पदाचा कार्यभार सांभाळून शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपावेतो / नियमित शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक पदावर नव्याने हजर होईपावेतो सांभाळावा व कार्यभार हस्तांतर केल्याबद्दलचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे.

श्री.नितीन उपासनी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रभारी, जिल्हा परिषद नाशिक तथा शिक्षणाधिकारी महानगरपालीका, नाशिक यांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे दिनांक ०९/०७/२०१७ पावेतोचे अल्प कालावधीचे दाखले व गोपनीय अहवाल प्रतिवेदीत / पुर्नविलोकन करुन संबंधीत आस्थापनांकडे न चुकता सादर करुन तसे प्रमाणपत्र या कार्यालयाकडेस सादर करण्याची दक्षता घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति,

श्री.नितीन उपासनी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रभारी, जिल्हा परिषद नाशिक तथा शिक्षणाधिकारी महानगरपालीका, नाशिक

श्री / श्रीमती भावना राजनोर शि. अ.(निरंतर) जिल्हा परिषद नाशिक

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर

म. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

म. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे

म. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग नाशिक

प्रत :- माहिती व कार्यवाहीसाठी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक

कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नाशिक

मुख्य लेखा वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नाशिक

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / (माध्यमिक) /(निरंतर), जिल्हा परिषद नाशिक / रोखपाल

साप्रवि ज्ञापन नस्ती